झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/650 /२०२३
दिनांक : 08/08 /२०२३

झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

सिध्दार्थनगर मौजे निगडी, सेक्टर नं.२२, स.नं.५८पै, ५९पै, ६२पै, पुणे अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०५/०६/२०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.०८/०६/२०२३ रोजी डकविण्यात आली असून दि.०७/०६/२०२३ रोजीच्या जन मंथन व लोकनायक या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जुन २२-२८, २०२३ मध्ये पृष्ठ क्र.९, १० व ११ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

(३) खालील अनुसूचीमध्ये नमूद केलली मिळकत ही झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम, १९७१ च्या कलम ४ (१) नुसार घोषित नसल्याचे दिसून येते. तथापि, सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.झोनिपु/०४/कावि/२०१/२०२२, दि.२१/१०/२०२२ अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. तसेच, उप अभियंता, प्रस्ताव, झोपुप्रा, पुणे यांचेकडील जा.क्र. झोपुप्रा/ प्रस्ताव/९४६/२०२३ दि.३१/०५/२०२३ रोजीच्या पत्रानुसार प्रत्यक्षात जागेवरील मोजणीनुसार सेक्टर नं.२२, स.नं.५८पै, ५९पै, ६२पै, सिध्दार्थनगर (भिमक्रांतीनगर, आंबेडकर वसाहत, काळभोर गोठा) (Non Buildable) या मिळकतीचे त्रिमिती पध्दतीनुसार एकूण क्षेत्रफळ १०२८०.३६ चौ.मी. इतके असून, स.नं.८९पै, MIDC भूखंड नं.RL २०९ ते RL २१६ आकुर्डी, पुणे (पुनर्वसन करावयाचे क्षेत्र) ४,५०७.०० चौ.मी इतके आहे.

(४) झोपडपट्टीने व्याप्त असलेली स.नं.५८पै, ५९पै, ६२पै, सिध्दार्थनगर (भिमक्रांतीनगर, आंबेडकर वसाहत, काळभोर गोठा) (Non Buildable) ही जागा संरक्षण विभागाच्या जागेनजीक रेड झोन म्हणून घोषीत असल्याने बांधकाम आयोग्य आहे व सदर मिळकतीवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन स.नं.८९पै येथील MIDC तर्फे विकसकाला वाटप केलेला भूखंड नं.RL २०९ ते RL २१६ आकुर्डी, पुणे या मिळकतीवर करणे प्रस्तावित असलेने अनुसूची क्र.१ व २ मधील नमूद दोन्ही मिळकतीचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल खात्री झालेली आहे.

(५) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे सदर बाबत कोणतीही हरकत अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

(६) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

(७) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता वर नमूद मुद्दा क्र. ३ पैकी क्षेत्र १०२८०.३६ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूची क्र.१ मध्ये नमूद एकूण १०२८०.३६ चौ.मी. क्षेत्र व अनुसूची क्र.२ मध्ये नमूद एकूण ४५०७.०० चौ.मी. क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमतः घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

(३) प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच, शासनाच्या मार्फत देण्यात येणा-या सर्व आदेशांचे व शर्ती -अटी यांचे पालन करणे अनिवार्य असेल.

<u>अनुसूची क्र.१</u>

**झोपडपट्टीचे नाव** :- सेक्टर नं.२२, स.नं.५८पै, ५९पै, ६२पै, सि.स.नं. १०१५ पै, सिध्दार्थनगर (भिमक्रांतीनगर, आंबेडकर वसाहत, काळभोर गोठा) (Non Buildable)

**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) पूर्णतः | चतु:सिमा | विकसकाचे नाव व शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सिध्दार्थ नगर मौजे निगडी | ५८ (पै), सि.स.नं. १०१५ पै | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | १०२८०.३६ चौ.मी. | पुर्व - स.नं.५८ पै., स.नं.६२ पै., (सि.स.नं.१०१५ पै) | मे. रेनबो डेव्हलपर्स, ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे - ४५. |
| | ५९(पै), सि.स.नं. १०१५ पै | खाजगी व पिंपरी चिंचवड महानगरपालिका | | दक्षिणेस - लागू रस्ता | |
| | ६२ (पै) सि.स.नं. १०१५ पै | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | | पश्चिमेस - लागू स.नं.५९पै., (सि.स.नं.१०१५ पै.) | |
| | | | | उत्तरेस - स.नं.५९ पै., ५८ पै., ( सि.स.नं.१०१५पै) लागू रस्ता | |

<u>अनुसूची क्र.२</u>

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.८९पै, MIDC प्लॉट नं.RL २०९ ते RL २१६ आकुर्डी, पुणे (पुनर्वसन करावयाचे क्षेत्र)
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा | विकसकाचे नाव व शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| आकुर्डी | स.नं.८९पै, MIDC प्लॉट नं.RL २०९ ते RL २१६ | १) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ<br>२) सदर मिळकतीचे भाडे पट्टयावर ताबा धारक - मे. रेनबो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर्स एल.एल.पी | ४५०७.०० चौ.मी. | पुर्व - १० मी. रस्ता<br>दक्षिणेस - प्लॉ.नं.P-२५ व P-२६<br>पश्चिमेस - एम.आय.डी.सी हद्द<br>उत्तरेस - एम.आय.डी.सी हद्द | मे. रेनबो डेव्हलपर्स, ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे - ४५. |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ०८/०८/२०२३

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

8.8.23

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी चिंचवड पुणे यांना- माहितीस्तव सादर व उचित कार्यवाहीस्तव.
   १ (अ) मा.उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, झो.नि.पु., पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना- माहितीस्तव.
२. मा.आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे (PMRDA) - यांना पुढील कार्यवाहीस्तव.
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड,पुणे -१९. यांना- माहितीस्तव सादर व उचित कार्यवाहीस्तव.
४. जमिन मालक - किसन काळभोर